# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik

सर्व्हे नं.६४८/ब २, फा. प्लॉट नं. ३११ पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी, नाशिक – ४२२ ००२

दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७ email : nmrda.nsk@gmail.com


## कार्यालयीन आदेश

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीमध्ये एकुण २७५ गावांचा समावेश असुन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार अस्तित्वातील व प्रस्तावित वर्गीकृत रस्त्यांचा विचार करुन, सदरगावांमध्ये प्राप्त होणा-या विकास परवानग्यांच्या प्रस्तावांना प्राधिकरण स्तरावर मान्यता देण्यात येते.

नाशिक महानगर प्राधिकरण क्षेत्रात होणा-या विकासाच्या वाढीचा विचार करता, नाशिक महानगरपालिका हद्दीतुन येणा-या रस्त्यांच्या जाळ्यांचे समन्वय साधुन सुनियोजन होणे आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याकरिता येणारी वाहतूक ही नाशिक प्राधिकरण क्षेत्रातून होणार असल्याने तसेच शिर्डी व ओझर विमानतळाहून होणा-या वाहतुकीचे नियोजन करण्याचे दृष्टीने व नाशिक प्राधिकरण क्षेत्रात वाढते औद्योगिकरण होत असल्याने, भविष्यात वाहतूक व्यवस्थापन सुनियोजीत होणेकरिता आत्ताच त्याबाबत विचार होऊन मोठ्या रुंदीचे रस्त्यांचे जाळे प्राधिकरण क्षेत्रात विकसीत होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणं हद्दीतुन जाणारे वर्गीकृत रस्ते जसे, ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांची रुंदी वाढविण्याची आवश्यकता आहे.

सदर रस्त्यांची रुंदी ही खालील तक्त्यात नमूद असल्याप्रमाणे वाढविण्यात यावी. तसेच यापुढे प्राप्त होणा-या सर्व विकास परवानगी प्रस्तावांमध्ये उपरोक्त प्रमाणे वर्गीकृत रस्त्यांच्या रुंदीबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच काही अपरिहार्य भौतिक / भौगोलिक अडथळे जसे की, नदी, धरणे, डोंगर इ. बाबत महानगर आयुक्त यांच्या पुर्व मान्यतेने निर्णय घेण्यात यावा.

| अ. क्र. | रस्त्याचे वर्गीकरण | सध्याच्या नियमानुसार रुंदी | प्राधिकरण हद्दीतील रस्त्यांकरिता प्रस्तावित रुंदी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण मार्ग | १५ मी. | १८ मी. |
| २ | इतर जिल्हा मार्ग | १८ मी. | २४ मी. |
| ३ | प्रमुख जिल्हा मार्ग | २४ मी. | ३० मी. |

जा.क्र.नामप्रविप्रा/कार्या.आदेश/ ५९३
दिनांक : 23/06/2024

(डॉ माणिक गुरसळ, भा प्र से)
**महानगर आयुक्त,**
**नाशिक महानगर प्रदेशविकास प्राधिकरण,**
**नाशिक**

Nashik Metropolitan Region Development Authority ★ Nashik

कृ.मा.प.

**प्रत** कार्यवाहीस्तव:

१) महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
२) सहमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
३) सर्व उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
४) सर्व सहायाक महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

**प्रत माहितीस्तव :**

१) क्रेडाई, नाशिक
२) न.रे.ङ.को., नाशिक
३) र्किटेक्ट ॲन्ड इंजिनियर असोसिएशन, नाशिक
४) सर्व नोंदणीकृत अभियंता / वास्तुविशारद
५) **NMRDA website**